# हिरण्यगर्भ

दोन अंकी नाटक

**प्रल्हाद जाधव**

भूमिका:

सौ. जोशी (४५)

श्री. जोशी (५०)

सौ. येरमाळकर (४५)

श्री. येरमाळकर (५०)

प्राची (२५)

प्रकाश (२५)

अंक पहिला / प्रवेश पहिला

(स्टेजचे दोन भाग. एकीकडे श्री. जोशी यांचा मुंबईतील फ्लॅट. दुसरीकडे श्री. येरमाळकर यांचे गावाकडील घर. फ्लॅट आणि घर यांच्या मधेमध पुढे एक कॉमन जागा. दोन्ही घरातील माणसं ती जागा कारणपरत्वे वापरू शकतात. शिवाय तीच जागा श्री. प्रकाश येरमाळकर यांचे अकोल्याचे घर म्हणून वापरता येते. अंधारातून संध्येचा आवाज येऊ लागतो. ॐ केशवाय नमः, ॐ नारायणाय नमः, ॐ माधवाय नमः, ॐ विष्णवे नमः, ॐ मधुसुदनाय नमः, ॐ त्रिविक्रमाय नमः, अंधारातच पडदा उघडतो. हळूहळू प्रकाश येतो. श्री जोशी यांचे घर. सकाळ. ते देव्हाऱ्यासमोर उघड्या अंगाने उभे. पूजा करीत आहेत.)

श्री. जोशी : (प्रदक्षिणा घालत) भद्रम न इती मंत्रस्य, ऐन्द्रो विमद ऋषी, अग्नी परमात्मा देवता, एकपदा विराट छन्दः, जपदोषापनुत्तये प्रदक्षिणा वर्तने विनियोगः, ॐ भद्रम नो अपिवातय मनः

आकाशात्पतीतम् तोयम् यथा गच्छती सागरम्

सर्व देव नमस्कार : केशवम् प्रती गच्छती

प्रमादातकुर्वताम् कर्म प्रच्यवेताध्वरेषुयत्

स्मरणादेव तद्विष्णो: संपूर्ण स्यादिती श्रुती :

विष्णवे नमो, विष्णवे नमो, विष्णवे नमो...

( नमस्कार करून शेजारचा शर्ट उचलून अंगात घालत सवयीने सौ. ना हाक मारतात.) अगंऽऽ ऐकलंस का?

सौ. जोशी : (आतूनच) हो, आले आले......

(जोशी सवयीने पेपर उचलून वाचत खुर्चीत बसतात. वर्तमानपत्र वाचणे हा त्यांचा आवडता छंद सौ. जोशी आतून चहाचे दोन कप घेऊन बाहेर येतात. 'घ्या' म्हणून एक कप श्री. जोशींच्या हातात देतात. ते नजर पेपरातच ठेवून कप उचलतात आणि एकेक घोट घेऊ लागतात. सौ जोशी त्यांच्याकडे पाहात आपला चहा घेऊ लागतात.)

सौ. जोशी : मी काय म्हणते?

श्री. जोशी : (पेपरातच)

सौ. जोशी : अहोऽऽऽ

श्री. जोशी : काय?

सौ. जोशी : जान्हवीचं पत्र आलंय.

श्री. जोशी : वाचलंय मी ते.

सौ. जोशी : यापुढे प्राचीसाठी आपण एकही स्थळ पाहाणार नाही असं लिहिलंय तिनं.

श्री. जोशी  : बरं.

सौ. जोशी : बरं काय बरं? काय ते ठरवून टाका आता एकदा.

श्री. जोशी : (लक्ष पेपरातच) हूं...

सौ. जोशी : एकतर तुम्हाला स्वत:ला काही करायला नको आणि माझी पोरगी लक्ष घालतेय तर त्याचीही दखल घ्यायला नको. उद्या तुम्ही रिटायर झाल्यावर काय गत होईल आपली?

श्री. जोशी : अगं पण मी काय करू? मुंडावळ्या बांधून उभा राहू का तिच्या जागी ? अनेकदा बोललोय मी तिच्याजवळ. ती समर्थ आहे तिचं बघून घेण्यासाठी.

सौ. जोशी : अहो, असं काय परक्यासारखं बोलातय. बाप ना तुम्ही तिचे ? लाखात एक असं स्थळ आहे हे कुलकर्णींचं. नंतर बसाल पश्चात्ताप करीत.

श्री. जोशी : अस्सं? काय करतो मुलगा?

सौ. जोशी : मंत्रालयात असिस्टंट आहे. डोंबिवलीत स्वतःच्या मालकीचा फ्लॅट. विशेष म्हणजे प्राचीला ओळखतो तो. जान्हवीजवळ पसंतीसुद्धा कळवलेय त्यानं. आज घरी येणार आहे भेटायला. तुम्ही काय तो सोक्षमोक्ष लावून टाका आजच्या आज.

(हातात दोन पुस्तकं घेऊन प्राची बाहेर येते. टेबलावरची पर्स उचलते आणि चपला घालून बाहेर जायला निघते.)

सौ. जोशी : कुठं चाललीस?

प्राची : पुस्तक बदलून येते.

श्री. जोशी : प्राची एक मिनिट.....

प्राची : (चपला काढून तिकडे जात.) काय बाबा?

श्री. जोशी : हे बघ, कोणतीही गोष्ट वेळेवर झालेली बरी असते.

प्राची : म्हणजे?

श्री. जोशी : आज ना उद्या ह्या प्रश्नाचा निकाल लावणं आवश्यक आहे. मुलगा तुझ्या आवडीचा केला तरी चालेल हे अनेकदा सांगितलंय मी तुला...

प्राची : मी नाही कधी म्हटलंय? मी फक्त एवढंच म्हणत होते की, तुम्ही काळजी करू नका वेळ आली की होईल लग्न.

सौ. जोशी : मग कधी येणार ओह ती वेळ, म्हातारी झाल्यावर? (प्राची खिदळते) नुसती दात काढत बस. वय झाल्यावर कोण पसंत करणार आहे तुला?

सौ. जोशी : जान्हवीनं आणखी एक स्थळ सुचवलंय. कुलकर्णी आहेत डोंबिवलीचे. मुलगा तुला ओळखतो म्हणे....

प्राची : आलं लक्षात. बरोबरच होता कॉलेजात. इतका काही खास नाही.

सौ. जोशी : ऊठसूट नावं ठेवायची प्रत्येकाला. असा कोणता राजपुत्र मिळणार आहे तुला ? इतकी स्थळं सुचवली जान्हवीनं पण प्रत्येकात काही ना काही खोट काढली, काय गरज होती तिला? मोठी बहीण झाली तर तिलाही तिचा संसार आहे ना? आता निर्वाणीचं कळवलंय तिनं की यापुढं प्राचीचं लग्न हा विषय माझ्यापुरता संपला !

प्राची : मग कळवा तिला आता, म्हणावं हा प्रश्न आता कायमचाच सुटला असून आम्ही मुहूर्ताच्या शोधात आहोत.

श्री. जोशी : म्हणजे?

प्राची : मुलगा पसंत केलाय मी. (संगीत)

सौ. जोशी : मुलगा पसंत केलाय? (प्राची पुन्हा खिदळते.)

श्री. जोशी : मी म्हटलं होतं ना तुला सगळं व्यवस्थित होईल म्हणून? ठेविले अनंते तैसेची राहावे. चित्ती असो द्यावे समाधान...

सौ. जोशी : कोण कुठलाय मुलगा? काय करतो?

प्राची : गेल्यावर्षी आम्ही दोघंही एमेला बरोबरच होतो. नंतर मी इकडं एमफिलला ॲडमिशन घेतल आणि तो एमपीएस्सीच्या परीक्षेला बसून डेप्युटी कलेक्टर म्हणून सिलेक्ट झाला. पहिलं पोस्टिंग अकोल्याला मिळालंय त्याला.

सौ. जोशी : डेप्युटी कलेक्टर? चला, सत्यनारायण पावला म्हणायचं. अहो, मी नवस बोलले होते सत्यनारायणाला. येत्या गुरुवारी पूजा घालून टाका. काय नाव मुलाचं?

प्राची : ( थांबून अंदाज घेत) प्रकाश येरमाळकर.

सौ. जोशी : येरमाळकर? म्हणजे......

प्राची : आपल्या जातीतला नाही.

श्री. जोशी : खरं म्हणतेस?

प्राची : खरंच सांगतेय बाबा. मुलगा मागासवर्गीय आहे.

सौ. जोशी : अहो, तिच्याबरोबर लागू नका. ती गंमत करतेय आपली. जाग जा तू पुस्तकं बदलायचीत ना?

प्राची : इतके दिवस तूच लग्नाचं टुमणं लावलं होतंस ना?

सौ. जोशी : हे बघ, तू आयुष्यभर कुमारी राहिलीस तरी चालेल पण यापुढे आता तो विषय काढणार नाही मी. अहो, आज तुम्हाला कसली भाजी देऊ डब्यात, मेथीची चालेल का? की उसळ देऊ?

श्री. जोशी : प्राचीनं काय सांगितलं ते एकलंस ना तू?

सौ. जोशी : साफ खोटं आहे ते.

प्राची : अगदी सिरिअसली सांगतेय. कधी ना कधी समजाणारंच होतं तुम्हाला.

सौ.जोशी : शपथ घे माझी.

प्राची : अगदी तुझ्या गळ्याची शपथ.

सौ. जोशी : म्हणजे आमच्या तोंडाला काळं फासायचं नक्की केलयंस तू!

प्राची : लग्न करणं म्हणजे तोंडाला काळं फासणं होतं का?

श्री. जोशी : प्राची, प्राची इथ बैस शांतपणे आणि नीट काय ते सांग बघू!

प्राची : नीटच सांगतेय मी बाबा. मी लग्नासाठी मुलगा पसंत केलाय आणि तो मागासवर्गीय आहे.

सौ. जोशी :  म्हणे मागासवर्गीय आहे! अहो त्या कुलकर्णींना होकार देऊन टाकू आपण. आज येणारच आहेत इथं अनायसे.

प्राची : ओळखते मी त्याला. एक नंबरचा लंपट आहे. असिस्टंट आहे म्हणे मंत्रालयात. डोकीवरून पूर म्हणजे अंडर सेक्रेटरी होईल मरता मरता . इकडं इतका चांगला मुलगा मिळतोय ते राहिलं बाजूला. महसूल खात्यातली नोकरी म्हणजे काय वाटलं काय तुम्हाला? आज डेप्युटी कलेक्टर आहे. आयएएसच्या परीक्षेला बसतोय नंतर. कलेक्टर, कमिशनर, सेक्रेटरी... रिटायरमेंटनंतर राज्यपालसुद्धा होऊ शकतो....

सौ.जोशी : वेळ आली तर तू म्हणतेस तितका हुशार आणि महत्त्वाकांक्षी आपल्या जातीतला मुलगा मिळवू आपण...

प्राची : इतका हुशार मुलगा स्वत:हून चालत येईल आपल्याकडं? मनात मांडे खत बसा. सेल्समन जसा आपलं प्रॉडक्ट घेऊन फिरतो ना तसं दारोदार फिरावं लागेल.

सौ.जोशी : कशाला दारोदार फिरावं लागेल? आजवर काय कमी स्थळं सुचवली जान्हवीनं? ह्या कुलकर्णीनं तर पसंतीसुद्धा कळवलीय.

प्राची : पण मला पसंत नाही तो. आणि एक सांग प्रकाशशी का लग्न करू नये मी, काय कमी आहे त्याच्यात?

सौ.जोशी : म्हणजे जातीचा विचार करायचा नाही असंच ना?

प्राची : जातीच्या मुद्याला चिकटून राहण्यात काहीही शहाणपण नाही आता. बाहेर वातावरण किती झपाट्यानं बदलतंय याची कल्पना नाही तुला.

सौ.जोशी : बाहेरचं मला सांगू नको. आपल्या घरण्याकडं बघ जरा.

प्राची : कसलं घराणं ? वार लावून जेवत आले आमचे सगळे पुराणपुरूष. भिक्षुकीच्या पलीकडे मजल गेली नाही कुणाची. काय कौतुक करायचं असल्या घरण्याचं. बुद्धिमत्तेला व्यवहाराची जोड दिली नाही तर नामशेष होऊन जाईल आपलं घराणं एक दिवस.

श्री.जोशी  : तू म्हणतेस तो हा मुलगा, काय नाव त्याचं?

प्राची : प्रकाश येरमाळकर. आणखी स्पष्ट करून सांगते! जातीनं कैकाडी आहे.

श्री/सौ : कैकाडी?

प्राची : हो. सुपं, रोवळ्या, टोपल्या, विणण्याचा पिढीजात धंदा आहे त्यांचा!

सौ.जोशी : अरे माझ्या कर्मा!

श्री.जोशी : दिसायला कसा आहे; असं विचारण्यात सुद्धा अर्थ नाही आता!

प्राची : मागासवर्गीय मुलगा दिसायला कसा असणार? बुटका, काळा, खुरटे केस. तोंडावर देवीचे व्रण. गावंढळ, अशुद्ध भाषा बोलणारा. तब्बेतीनं तसा बरा आहे पण सारखी सर्दी होते आणि सटासट शिंकत बसतो मग.

सौ.जोशी : मी तुला अखेरचं सांगते, तुला जर त्याच्याशी लग्न करायचं असेल तर आधी मला विष आणून दे.

प्राची : आणि तुम्ही जर मला त्याच्याशी लग्न करून देणार नसाल तर मला विष आणून द्या.

श्री.जोशी : प्राचीऽऽऽ

प्राची : हो बाबा. (पर्समधून एक बाटली काढत ) मला याची पूर्णपणे कल्पना होती म्हणून आधीच विषाची तयारी करून ठेवली होती. ( दाखवत) ही बघा बाटली. अगदी प्युअर आहे. (बाटली टेबलावर ठेवते.) आम्हा दोघींपैकी कोणीतरी मेल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही असं दिसतंय. तेव्हा आता ठरवू कोणी मरायचं ते! (शांतता)

सौ. जोशी : तू इतकी पुढं जाशी याची कल्पना नव्हती.

प्राची : आणि समजा आम्ही लग्न करून डायरेक्ट पाया पडायलाच आलो असतो तर ? (सौ. जोशी निरूत्तर) आम्ही ठरवलंय बाबा, मोठ्या माणसांना योग्य तो मान दिलाच पाहिजे. तुम्हाला दुखवून आम्हाला लग्न करायचं नाही. आम्ही फक्त एकमेकांना आवडलोय इतकंच. लग्नाचा अंतिम निर्णय मात्र तुम्ही पालकांनी घ्यायचाय. (ती पुस्तकं घेऊन चप्पल घालून बाहेर निघून जाते.)

सौ.जोशी : निर्णय आपण घ्यायचाय असं म्हणाली ती, म्हणजे काहीतरी मार्ग निघू शकेल.

श्री.जोशी  : कसला मार्ग निघणाराय? विषाची बाटलीसुद्धा आणून ठेवलीय तिनं ...

सौ.जोशी : हेच नडतं तुमचं. तुमच्या ह्या ढिल्या स्वभावामुळंच डोक्यावर बसलेय ती. जान्हवीपाठोपाठ लगेच आटपून टाका म्हटलं तर नको 'शिकू दे शिकू दे!' किती सुंदर स्वप्न बघितलं होतं मी तिच्या संसाराचं... एक छोटा-साधा फ्लॅट... दोन गोजिरवाणी मुलं... मांडीवर खेळणारी... गोष्टीसाठी हट्ट धरणारी... माझ्या कुशीत झोपणारी, मेहेनतीची अर्धी भाकरी आनंदानं खाणारा जावई ...

(दारावर टकटक होते. दारात एक देखणा हसतमुख तरूण उभा. हा प्रकाश)

प्रकाश : मी आत येऊ का?

(त्यांना तो कुलकर्णी वाटतो. त्या लगबगीने)

सौ. जोशी :  हो या या ... जान्हवीनं कल्पना दिलीच होती आपण येणार म्हणून.

प्रकाश : ( वाकून दोघांनाही) नमस्कार करतो.

सौ. जोशी : औक्षवंत व्हा. मुलगी गुणी आहे आमची. संसार अगदी सुखाचा करील तुमचा.

प्रकाश : म्हणजे तुमची संमती...

सौ. जोशी  : आता आणखी संमती कसली द्यायची? अगदी लक्ष्मी नारायणसारखा जोडा दिसेल तुमचा.

प्रकाश : मला खात्री होतीच की तुम्ही हो म्हणाल. जातीपातीचे विचार किती झपाट्यानं मागं पडत चाललेत.

सौ. जोशी : जातीपातीचे? म्हणजे समजले नाही मी?

प्रकाश : प्राची काही बोलली नाही का तुमच्याजवळ?

सौ. जोशी : नाव काय आपलं, कुलकर्णीच ना आपण?

प्रकाश : मी... प्रकाश येरमाळकर.

सौ. जोशी : ( चट्कन बदलत) येरमाळकर? तुम्ही आमच्या मुलीला फूस लावायला नको होती.

प्रकाश : मी काही तिला फूस वगैरे लावलेली नाही. आणि ती जर 'नाही' म्हणत असेल तर माझं काहीच म्हणणं नाही.

सौ. जोशी : ती नाही म्हणू शकणार नाही इथवर प्रकरण आल्यावर तुम्ही सांगताय हे?

प्रकाश : माझ्यावर विश्वास ठेवा, असं काहीही प्रकरण वगैरे झालेलं नाही. मनात आणलं असतं तर पळून जाऊन लग्न केलं नसतं का आम्ही?

श्री. जोशी : ( हस्तक्षेप करत) बसा मिस्टर प्रकाश. प्लीज...

प्रकाश : थँक्यू!

श्री. जोशी : मूळ गाव कोणतं आपलं?

प्रकाश : येरमाळा. फलटण तालुक्यात आहे. जिल्हा सातारा...

श्री. जोशी : घरी कोण कोण असतं?

प्रकाश : : मी आई आणि वडील. एक बहीण होती पण ती लहानपणीच गेली.

श्री. जोशी : अच्छा... वडील काय करतात?

प्रकाश : पोलिसात होते. नुकतेच रिटायर झाले. थोडी जमीन आहे आमची. बागायती आहे. तिची देखभाल करतात आता.

श्री. जोशी : पोलिसात काय काम करायचे?

प्रकाश : तसे लागले कॉन्स्टेबल म्हणून; पण आपल्या कर्तबगारीच्या जोरावर हेडकॉन्स्टेबलपर्यंत मजल माली. आमच्या घराण्यातील एखाद्या व्यक्तीनं भूषवलेलं हे सर्वोच्च शासकीय पद. ( श्री. जोशी रिलॅक्स होऊन हसतात) थोडे शिकले असते तर इन्स्पेक्टर झाले असते. येरू धाकू वाटेगावकर माहीत आहे का तुम्हाला?

श्री. जोशी : कोण?

प्रकाश : येरू धाकू वाटेगावकर! तो कुप्रसिद्ध दरोडेखोर?

श्री.जोशी : हां हां तो? पेपरात बरंच काही छापून आलं होतं त्याच्याविषयी...

प्रकाश : बरोबर...पोलिसांच्या हातावर तुरी देऊन दहा वर्ष फरार होता. एकदा शेतात भाकरी खात बसलेला दिसला बाबांना. शेजारी डबल बॅरल बंदूक. बाबा निःशस्त्र पण तशाही परिस्थितीत वाघासारखी हिंमत दाखवून पकडला त्याला...

श्री.जोशी : फार धाडसी दिसतात तुमचे वडील.

सौ. जोशी : ते ह्यांच्यावरनंच लक्षात यायला हवं होतं तुमच्या!

प्रकाश : (स्पोर्टली घेत हसतो. जोशींना पुन्हा ) आवाजसुद्धा फार खडा आहे. बाबांचा. लावणी म्हणायला सुरुवात केली तर माणूस हलत नाही जागचा.

श्री.जोशी : लावणी? नाही म्हणजे लक्षात आलं नाही माझ्या?

प्रकाश : तमाशाचा त्यांना लहानपणापासूनच नाद. तमाशात गेले असते तर खूप मान-सन्मान, किर्ती मिळवली असती. पण आजोबांनी सक्तीनं त्यांना पोलिसात भरती केलं आणि त्यांच्या जीवनाची दिशा बदलली. पण तरीही तमाशाचा नाद काही सोडला नाही त्यांनी. तुम्ही कोणतीही लावणी म्हणायला सांगा. पठ्ठेबापूरावांपासून रामजोशांपर्यंत, सगळ्या तोंडपाठ. तशी आता भेट होईलच म्हणा तुमची!

सौ. जोशी : भेट हाईल? ती कशी काय? नाही म्हणजे एखाद्या तमाशाला वगैरे घेऊन जाणार आहात की काय आम्हाला?

प्रकाश : (हसत) अहो, आता लग्न करायचं म्हणजे एकमेकांच्या भेटीगाठी होणार की नाही? आई-बाबांना दोन दिवस घेऊन येणार आहे मी इथं. तुम्हालाही घेऊन जाणार आहे आमच्या गावी. आमचं गाव बघा, घर बघा. परस्परांना भेटा, समजून घ्या. लग्न म्हणजे केवळ दोन व्यक्तींचं मीलन नसून दोन घरण्याचं मनोमीलन असतं. तुमच्या घरण्याची गंगा, आमच्या घराण्याची यमुना आणि दोनही घराण्यातील चांगुलपणाची गुप्त सरस्वती असा त्रिवेणी संगम साधला की ' वाजवा रे वाजवा!’

सौ.जोशी : तुमच्याइतका सुसंस्कृत मवाली आजवर पाहिला नव्हता मी.

प्रकाश : काय मवालीगिरी केली मी?

सौ.जोशी : (संतापत) वरती तोंड करून मलाच विचारताय? एखाद्या हॉटेलात जाऊन चहाची ऑर्डर द्यावी तितक्या सहजपणे दिवसा ढवळ्या आमच्या घरात शिरूध आमची पोरगी मागताय. काही लाज शरम आहे की नाही तुम्हाला?

श्री.जोशी : (सौ. जोशींवर संतापत) तुला जर पटत नसेल तर नाही म्हणून मोकळी हो. त्यासाठी उगाच लाजशरम कशाला काढायला हवी कुणाची?

प्रकाश : त्यांचा उद्रेक होणं स्वाभाविक आहे. बोलून घेऊ दे म्हणजे मन तरी मोकळं होईल त्यांचं....

सौ.जोशी : काही मन वगैरे मोकळं करण्याची गरज नाही. हे लग्न आम्हाला मान्य नाही.

प्रकाश : आजच तुम्ही निर्णय घ्यावा अशी आमची अपेक्षा नाही. सावकाशीनं विचार करा आणि ठरवा काय ते. मी गरिबीत वाढलो. अतिशय चिकाटीनं शिकलो. सुदैवानं नोकरीसुद्धा चांगली मिळालीय. जाईन तिथं गाडी, बंगला, फोन सर्व प्रकारच्या सोयी प्रायॉरिटीनं मिळतील. सुखात ठेवीन तुमच्या मुलीला तिच्याही नोकरीचं जमवून देईन एखाद्या कॉलेजात.

सौ.जोशी : तुम्ही कितीही मोहात पाडण्याचा प्रयत्न केलात तरी आम्हाला जमणार नाही.

प्रकाश : कारण सांगितलंत तर बरं होईल. अगदी स्पष्टपणे बोला. मला काहीही वाईट वाटणार नाही.

सौ.जोशी : काय सांगायचं त्यात, तुमची जात कोणती, आमची कोणती?

प्रकाश : जातीपातीचे विचार खूप मागं पडलेत आता. वेगवेगळ्या जातीधर्माचे लोक नोकरीधंद्याच्या निमित्तानं एकत्र येताहेत. खांद्याला खांदा लावून काम करताहेत. जातपात बाजूला ठेवून ऐकमेकांच्या आधारानं राहिलो तरंच पुढं जाता येईल हे लक्षात आलंय लोकांच्या.

सौ.जोशी : लोकांना काय वाट्टेल ते करू दे. आम्हाला देवधर्म सोडायचा नाही.

प्रकाश : देवधर्म सोडला नाहीत तरी चालेल पण देवधर्माच्या चुकीच्या कल्पना सोडाव्याच लागतील तुम्हाला आज ना उद्या.

सौ.जोशी : म्हणजे?

प्रकाश : 'चातुर्वण्यम् मया सृष्टम्' असं श्रीकृष्णानं म्हटलं; पण ते गुणकर्माच्या आधारे. आपण त्यामागं जात चिटकवली आणि त्यामुळं निर्माण झालेल्या फाटाफुटीची फळं भोगतोय आपण आज. पण अशातही जातीपातीचा विचार न करता गुण्यागोविंदानं नांदावं असं मानणारा एक फार मोठा समजूतदार वर्ग समाजात निर्माण झालाय. त्यात तुम्ही नाही का?

सौ.जोशी : आम्हाला काहीही क्रांती वगैरे करायची नाही. हाताची पाची बोटं सारखी असतात का?

प्रकाश : नसतात; पण प्रत्येकाच्या हाताला तशीच बोटं असतात ना? मी मागासवर्गीय आहे म्हणून माझ्या डोक्यावर शिंग उगवलेली दिसतात का तुम्हाला?

सौ.जोशी : तुम्ही कितीही शहाणे असलात तरी आमच्यापैकी नाही एवढं लक्षात ठेवा.

प्राची : (येत) अरे आलास तू? संध्याकाळचं ठरलं होतं ना?

प्रकाश : हो, पण तिकडं लॉ अँड ऑर्डरचा काही प्रश्न निर्माण झालाय. ताबडतोब हजर व्हायला सांगितलंय त्यामुळं संध्याकाळच्या गाडीनं निघतोय. थोडा वेळ होता म्हणून म्हटलं जाता जाता भेटून घ्यावं आई-बाबांना...

प्राची : ओळख झाली असेलच.

प्रकाश : झाली ना. आई म्हणत होत्या की तुम्ही आमच्यापैकी नाही. मानववंशशास्त्राचा अभ्यास परीक्षेसाठी उपयोगी पडला नाही. पण तुमच्या घरी उपयोगी पडेल असं दिसतंय.

प्राची : म्हणजे?

प्रकाश : आजचा आपला भारतीय समाज एकूण सहा वंशाच्या मिश्रणातून निर्माण झाल्याचं वाचलं होतं त्याची आठवण झाली. ज्या रक्ताचा आपण अभिमान बाळगतो ते सहाव्या पिढीपर्यंत पूर्णपणे बदलून गेलेलं असतं हे माहिताय ना तुला?

प्राची : थांबव बाबा तो विषय. नाहीतर घरातच एखदं व्याख्यान सुरू करशील.

प्रकाश : नाही, व्याख्यान देत नाही; पण आपला अस्सलपणा सिद्ध करायचा झाला तर किती गमती-जमती होतील नाही? म्हणजे आपली आजी किंवा खापरपणजी किंवा खापरपणजीची खापरपणजी कधीतरी कुणाबरोबर तरी पळून गेलेली असणार. किंवा कधीतरी आपला एखादा पणजा किंवा खापरपणजा एखाद्या परस्त्रीवर भाळला असणार किंवा कधीतरी आपल्या मागच्या पिढीतील बुळ्या पुरूषांचा पराभव करून आपल्या टोळीतील बायका दुसऱ्याच टोळीतील शूर पुरूषांनी पळवून नेल्या असणार (शिंकतो) किंवा आपली आई जोकास्टा आणि बाप इडिपस असणर (शिंकतो) किंवा आपण ॲडम आणि इव्हचे नातू (शिंकतो) म्हणजेच केन्सचे पुत्र स्वत:च्याच बहिणींशी लग्न करणारे (शिंकतो) मग आपल्या अस्सलपणाला आधार काय? (शिंकतच रहातो)

प्राची : बापरे, किती सर्दी झालीय तुला. थांब हं औषध देते. (असं म्हणून पटकन टेबलावरची बाटली उचलून बूच काढून प्रकाशच्या हातात देते. तो ती तोंडाला लावणार तोच सौ. जोशी 'अगं त्यात विष आहे' म्हणत शिताफीनं ती उडवून लावतात. मोठा पॉज. सर्वजण एकमेकांकडे पाहात आहेत) सर्दीचं औषध होतं त्यात.

ह्याच्यासाठी आणून ठेवलेलं. पण हा जो क्षण तू जगलीस आई तो खरा लाखमोलाचा. पिढ्यान् पिढ्यांच्या तथाकथित संस्कारांची पुटं तुझ्या मनावरून गळून पडली आणि तुझ्यातील निखळ माणुसकीचा तेजस्वी किरण लखकन् बाहेर पडला. आमच्या लग्नसाठी तुझ्या आत्म्यानं दिलेला हा कौल समज. (आईकडे अपेक्षेने पाहाते. त्या अडचणीत निर्णय घेऊ शकत नाही अशा अर्थी त्या मान हलवत राहातात. हळूहळू अंधार.)

अंक पहिला / प्रवेश दुसरा

(गायीच्या हंबरण्याचा आवाज ऐकू येतो. हळूहळू प्रकाश. येरमाळकरांचे घर दिसते. संध्याकाळ. पडवीच्या खाली म्हणजे विंगेत गोठा, गोठ्यात येरमाळकर गायीचे दूध काढत आहेत. गोठ्यातून त्यांचा आवाज ऐकू येतो.)

श्री. येर. : (गायीला ) अगंऽऽ हो...हो... गप... गप उभी ऱ्हाय म्हन्तो ना ! किती द्वाडपणा करशील? हाय आत्ता? झालं - झालं... होऽऽ है है है ... है शाब्बास ! (बाहेरूनच पत्नीला हाका मारत आत येतात) हौशेऽऽ ए हौशेऽऽ हौशेऽऽए हौशेऽऽ कुठं गेली म्हनायची? अगं भैरी झालीस का, किती हाका मारायच्या माणसानं?

सौ.येर. : (हातातला झारा तसाच फिरवत स्वयंपाक घरातून बाहेर येत) काय झालं इतकं वरडायला ! काय वाघबीघ लागलाय का काय मागं?

श्री. येर. : आगं लय द्वाडपना करीत व्हती 'मंजी' आज.

(हातातली दुधाची चरवी पुढे करत) घे!

सौ. येर : एवढ्यासाठी उठवलं मला वडे तळता तळता? आत आनून देण्याला पाय मोडलेते जनू? निस्तं आपलं राबवून घेयाचं... आना हिकडं (चरवी हिसकावून घेत) बिगारीचं घोडं आन् तरवडाचा फोक!

श्री येर : बरं बरं आता लेक साहेब झालाय ना तुझा ? आता चार पाच मोलकरनी ठीव आन् खुशाल राणीगत पलंगावर पडून  राहा...

सौ.येर  : ऱ्हानारच हाय, तुमी नका शिकवू मला... आन् आवरा लवकर आता, तुमी जाताय नव्हं?

श्री. येर. :  कुठं?

सौ. येर :  दुसरं कुठं? टॅंडवर. येस्टीची वेळ झाली की !

श्री. येर. : हां...हां...पैलवानाला आनाय जाऊ म्हन्तीस व्हय? आता काय लहान हाय का त्यो? का उचलून आनायचाय त्याला?

सौ.येर. : आवं पन बा घेयाला आला म्हणून आनंद न्हाय का व्हनार त्याला?

श्री.येर. : तुला खरं सांगू हौशे, आगं धीरच न्हाय व्हत बघ. समदं आयुष्य गेलं दुसऱ्यांना शॅलूट मारन्यात आता सोताचा पोरगा साहेब व्हवून येतुया तर कसं भेटावं त्याला काय कळाना झालंय आगदी. (बंडीमधून बाटली बाहेर काढतात.)

सौ.येर. : ( सणकत) आवो ठिवा ती बाटली. निदान आज तरी पिऊ नका. बाळाला काय वाटंल?

श्री.येर. : काय बी वाटायचं न्हाय. समदं ठावं हाय त्याला. (घोट घेतात.)

सौ. येर. : अवदासा मेली, सवतीसारखी कायमची ऊरावर बसली.

श्री. येर. : सवत हाय खरं ही तुझी. पन मला काय हौस व्हती का तिच्या नादाला लागायची? पोलिसात लागलो आन् समदा घोटाळा झाला बघ. हा: हा: हा: हा:

सौ.येर. : (एकदम आठवून) कर्म माझंऽऽऽ

श्री.येर. : काय झालं गंऽऽऽ

सौ.येर. : आवो वडा करपला की आत. (धावत आत जाते.)

श्री.येर. : ( स्वत:शीच ) लेक साहेब व्हवून येतुया ह्या आनंदानं खुळी झालीय हौशी! (स्वत:ही त्याच आनंदानं उत्तेजित झालेले.) बूच उघडून आणखी एक घोट घेतात. एकदम कोंबड्यांचा कलकलाट होतो म्हणून ते उठतात आणि खिडकीतून गोठ्याच्या बाजूला डोकावून पाहतात.) हाऽऽ.... हाऽऽऽ...हाड तिच्या मायला... (शांतता होते. पुन्हा पहिल्याजागी येऊन बसतात. घोट घेतात.) हौसाऽऽऽ ए हौशेऽऽऽ

सौ.येर. : ( आतूनच) काय वं?

श्री.येर. : कोंबडी लयी तिखट करू नगं बरं का. पैलवानाला तिखट चालत न्हाय जास्त.

सौ.येर. : ( आतूनच ) तुमी नका काळजी करू त्याची. (श्री. येर. आणखी एक घोट घेतात. सौ.येर.पदराला हात पुसत पुसत बाहेर येत) आवंऽऽऽ

श्री. येर. : काय?

सौ.येर. : म्या काय म्हन्ती?

श्री. येर. : काय?

सौ.येर. : कमळी कशी काय वाटली तुमाला?

श्री. येर. : कमळी म्हंजी तुझ्या भावाची म्हन्तीस व्हय?

सौ. येर : आन् दुसरी कंची?

श्री. येर. : बरं, काय तिचं?

सौ. येर. : म्या म्हनत व्हते बाळासाठी कशी हाय?

श्री.येर. : म्हजी?

सौ.येर. : आवं आता लगीन करून देया नकु का त्याचं? घरातलीच पोरगी हाय. गुणाची हाय. दादा परवा इचारत व्हता...

श्री.येर. : पोरगी बरी हाय पन तुजा तो दादा कशे गूण उधळतोय ठावं हाय ना? एक पाय घरात आन दुसरा जेलात.

सौ.येर. : आवं पन पोरगी लाखात एक हाय का न्हाय? सांगितल्या कामाची आन् दिल्या भाकरीची.

श्री.येर. : पन पैलवानाला पसंत पडाया हवी का नको? का उगा आपलं म्हैस पान्यात आन् सौदा दरडीवर करावा?

सौ.येर. : पडंल त्याला पसंत, तुमीबी जरा नेट लावा म्हजी झालं.

श्री. येर. :  हाय आत्ता? आगं त्याला येऊदी तर आधी...

(इतक्यात प्रकाशची बाहेरून बाबाऽऽऽ अशी हाक ऐकू येते. 'अग आला वाटतं' म्हणत ते दरवाजाकडे धावतात. 'शंभर वर्ष आविष्य हाय माज्या लेकराला' म्हणत हौसाबाई घरात जाऊन भाकरीचा तुकडा आणि पाणी घेऊन बाहेर येतात. प्रकाश बॅग घेऊन दरात उभा. येरमाळकर त्याला कवळा मारून उचलतात आणि 'आला का आमचा पैलवान' म्हणून गोल फिरवून खाली ठेवत हा: हा: हा: हाः करत हसतात. सौ. येरमाळकर त्याच्यावरून भाकरीचा तुकडा ओवाळून टाकतात. पाणी फिरवतात. तो आईच्या पाया पडतो. 'गुणाचा माझा बाळ' म्हणत त्या त्याच्या गालाला हात लावून मुका घेतात.)

सौ. येर. : दमला आसशील. हातपाय धवून घे आदी.

प्रकाश : (बॅग उघडत) दमायचं कसलं त्यात? तिथं बसायचं आणि इथं उतरायचं. थोडा थकवा आला होता पण तुम्हाला बघितल्याबरोबर पळून गेला तो. (बॅगेतून एक ड्रेस काढून) बाबा हा तुम्हाला ड्रेस आणि आई हे तुला. (एक काठपदराचं हिरवं लुगडं आईला देतो.)

सौ. येर. : (कपडे पाहात) आरं कशाला आता आमाला म्हातारपनात ही फ्याशनेबल कापडं ? (हौसाबाई अंगावर लुगडं धरून कौतुकानं पाहात आहेत.)

प्रकाश : कसलं म्हातारपण? वृद्धत्व हे दुसरं बाल्य असतं.

श्री. येर. : (त्याच्या सुभाषित वजा वाक्याने भांबावून) आँ?

प्रकाश : अहो म्हातारी माणसं आणि लहान मुलं सारखीच असतात. आपलं नवीन आयुष्य सुरु झालंय असंच समाजायचं आता तुम्ही.

श्री.येर. : आसं व्हय? बरं बरं

(प्रकाश बॅग बंद करून पाय धुण्यासाठी आत जातो. ही दोघं नवीन कपड्यात गुंतलेली.)

श्री.येर. : (भारावून) हौशे SऽS

सौ.येर. : काय वं?

श्री.येर. : पैलवान ल्हान व्हता तवा एकडाव त्याला घेऊन म्या इरोबाच्या जत्रंला गेलो व्हतो. तारंवरनं तुरूतुरू वरखाली पळनारं प्लास्टिकचं माकड पायजे म्हणून बाळानं हाट धरला.

सौ.येर. : मंग?

श्री.येर. :  पैशे न्हायीत म्हणून सांगितलं तरीबी ऐकंना म्हणताना फडाफडा मारला त्याला कानसुलं लाल झाली...

सौ.येर. : खरंच नव्हते जनू पैशे?

श्री.येर. : तेच सांगतुया. पैशे व्हते पन तमाशा बघायचा व्हता मला. पाय आपोआप वळले तिकडं. म्या चांडाळान् ह्या हातानी मारलं पोराला...

प्रकाश : ( आतून हे ऐकत हात पाय पुसत बाहेर येत) जाऊद्या बाबा, कशाला काढताय त्या जुन्या आठवणी? आणि एखाद वेळ मारलं असेल त्याचं इतकं काय वाटून घ्यायचं? उलट मला असे अनेक प्रसंग आठवतात की

ज्यावेळी तुम्ही मला स्वतःच्या जीवावर उदार होऊन जगवलंत, तळाहातावरच्या फोडासारखं जपलंत. शब्दात सांगता येणार नाही असे कष्ट उपसलेत. पण आता संपलं ते सारं. आता पुढचं आयुष्य आपण साऱ्यांनी आनंदात आणि सुखात एकत्र काढायचं.

सौ.येर. : म्हंजे आमीबी तुझ्याबरूबर आकोल्याला येयाचं व्हय?

प्रकाश : बरोबर.

श्री.येर. : आन् मग ही शेतीवाडी कोन बघनार? गुराढोरांचं कोन करनार?

सौ.येर. : हे समदं टाकून चित्त न्हाय लागायचं आमचं तिकडं.

प्रकाश : तुम्हाला महसूल खात्यातल्या नोकरीची कल्पना आहे बाबा. सारखी धावाधाव आणि पळापळ चोवीस तास ॲलर्ट राहावं लागतं. अशा ओढाताणीत तुमचा आधार मिळेल मला.

सौ.येर. : अशा वेळी बायकूच हवी सोबतीला. तू लगीन कर आता...

श्री.येर. : अगं पन...

सौ.येर. : (त्यांना अडवीत) तुमी गप बसा. (प्रकाशला) कमळी ठाव हाय ना? (प्रकाश पाहातच राहातो) आसं काय बघतोस? मामाची मुलगी तुझ्या. लिवन्या वाचन्यापुरतं शिकलीय. गुणाची हाय, संसार चांगला करील तुझा.

प्रकाश : मी मुलगी बघितलेय आई.

सौ.येर. : काय म्हनालास?

प्रकाश : मुलगी बघितलेय मी. तुम्हाला सांगणारच होतो थोड्या वेळानं, पण बरं झालं तुम्हीच विषय काढलात. कॉलेजात बरोबरच शिकत होतो आम्ही.

सौ.येर. : हां मुलगी बघितलीय! ते काय न्हाय म्या सबुद दिलाय मामाला. त्यो तर आंतरपाट धरूनच उभा हाय तिकडं.

प्रकाश : अगं पण लग्न कुणाला मला करायचंय ना? मग तू कसा काय शब्द दिलाय त्याला?

सौ.येर. : म्हजी? म्या कोनच लागत न्हाय काय तुजी?

प्रकाश : च्... तुला कसं सांगू आई! हे बघ, आपण एखादा चांगला मुलगा बघून देऊ तिच्यासाठी; पण मला जमणार नाही.

( हौसाबाई डोळ्याला पदर लावून काय आलं हे नशिबाला - म्हणत रडू लागतात. श्री. येरमाळकर त्याच्यावर संतापतात)

श्री.येर. : हाय आत्ता? म्या म्हनत नव्हतो तुला की भ्रमात न्हाऊ नको म्हनून? आता कशापायी रडून आपशकून करती त्याला? त्याचं बरंवाईट समजत न्हाय का त्याला? (प्रकाशला) कुठली मुलगी हाय? काय करती?

प्रकाश : बाबा, मुलगी आपल्या जातीतली नाही.

सौ.येर. : (हुंदका) म्हजी मग?

प्रकाश : ब्राह्मण आहे.

श्री : खरं म्हन्तोस?

प्रकाश : हा विषय चेष्टा करण्यासारखा आहे का बाबा?

श्री. येर. : बामण?

प्रकाश : हो.

श्री.येर.  : न्हाय - बामणाची पोर म्हंजी भांडणतंटे, हाणामाऱ्या, शिवीगाळ, कोर्टकचेऱ्या...

प्रकाश : असलं काहीही होणार नाही. त्यांच्या घरी माहीत आहे.

सौ.येर. : आरं, पन आपल्या जातीचा कही इचार? लोक श्यान घालतील तोंडात. वाळीत टाकत्याल. उद्या तुझ्या पोराबाळांचं काय व्हईल ह्याचा इचार केलास का?

प्रकाश : कसला विचार? काय केलं जातीनं आपल्यासाठी? बाबांच्या आजारपणात भांडी कुंडी गहाण ठेवून तूच पैसे मिळवलेस ना ! मला कॉलेजात ॲडमिशन घ्यायला पैसे नव्हते, तेव्हा तूच मंगळसूत्र मोडलंस ना तुझं? तेव्हा दिले कुणी चार पैसे काढून? एकुलती एक बहीण औषधाअभावी तडफडून मेली तेव्हा आलं कोणी मदतीला?

श्री.येर. : तू म्हन्तोस ते बराबर हाय, पन लग्नाच्या कामात गडबड करून जमायचं न्हाय. घरचा-दारचा इच्यार करावाच लागंल बाळा.

प्रकाश : मी सर्व विचार करूनच बोलतोय बाबा. वातावरण किती झपाट्यानं बदलतंय बाहेर. दलित शिकताहेत, व्यापारी राजकारणात आलेत, मराठे नोकऱ्या करताहेत, ब्राह्मण उद्योगधंद्यात उतरलेत. सगळी चौकट मोडून पडलीय. मंत्रालयात, पोस्टात, महानगरपालिकेत वेगवेगळ्या जातीधर्माचे लोक खांद्याला खांदा लावून काम करताहेत. एकत्र जेवताहेत. आंतरजातीय लग्नसुद्धा किती मोठ्या प्रमाणावर होऊ लागलीत!

श्री.येर. : हे समदं ठीक हाय पैलवान, पन मानसाच्या मनातली जात गेली का?

प्रकाश  : तुमचं म्हणणं बरोबर आहे बाबा पण जे झालेलं नाही त्यापेक्षा जे झालंय त्याचा विचार करणं अधिक महत्त्वाचं असंत ! पन्नास-शंभर वर्षापूर्वीची परिस्थिती आता राहिलेय का सांगा बघू? (श्री. येर. निरूत्तर) मनातली जातसुद्धा विसरायला लागतील हळूहळू लोक. पण त्यासाठी अजून बराच काळ जावा लागेल. ती काही खरेदी-विक्रीसारखी चट्कन होणारी गोष्ट नाही.

श्री.येर. : न्हाय, मला पटतंय तुझं पर तुझ्या आयेचं काय?

प्रकाश : काढू तिची समजून आपण (आईजवळ जात) हे बघ आई, तुला आवडेल अशीच मुलगी पसंत केलेय मी. लाखात एक, देखणी, गुणी. आपलं घर सांभाळू शकेल अशी. तू तिला बघ तर खरी, अगदी खुश होऊन जाशील.

सौ.येर. : कायतरी जादूटोणा केलेला दिसतुया त्या हडळीनं तुझ्यावर.

प्रकाश : हं, हे मात्र बरोबर बोललीस. माझ्यावर जादूटोणा तर केलायच पण मलाही जादू करायला शिकवलंय तिनं बघायचंय? आत्ता जादूनं तुझ्यासमोर उभी करतो तिला, रेडी? एक-दोन-तीन!

(टाळी वाजवतो. प्रकाशाची उघडझाप . दारात हसतमुख प्राची उभी. एका हातात बॅग. खांद्याला शबनम. प्रकाश धावत जाऊन तिच्या हातातली बॅग घेतो आणि घेऊन आत येतो. ती दोघांनाही वाकून नमस्कार करते आणि ओट्यावर बसते. त्या दोघांनाही हा शॉक. कोणी काहीच बोलत नाही. तणाव. शेवटी प्राचीच सुरूवात करते.) आम्ही बरोबरच आलो, एकाच गाडीनं. हा म्हणाला आईबाबांची जरा गंमत करू. म्हणून मला बाहेरच उभी करून ठेवली होती यानं...

सौ.येर. : (त्यांचा एकदम उद्रेक होतो. ऊर बडवून घेत.) आता काय करावं ह्या कर्माला? आरं कशापायी हा इस्तू पदरात बांधून घेतलास बाळा? चांगल्या घरातली पोर उचलून आनलीस ह्या परमुलखात. उद्या गावभर बभ्रा व्हईल. बाईच्या जातीची आब्रू काचंच्या भांड्यागत आस्ती. एकडाव गेली की गेली. जा पोचवून ये ह्या बयेला तिच्या घरी. जा ...

प्राची : अहो, तुम्ही कशाला काळजी करताय आई? घरच्या लोकांची परवानगी घेऊनच याच्याबरोबर आलेय मी.

सौ.येर. : तू गप गं रांडं... वाटोळं करायला निघालीस माज्या पोराचं. ऊठ रे! न्हेवून पोचीव हिला ताबोडतोब तिच्या घरी. गतकाळी रांड मेली...

श्री.येर. : ( सणकत) हाय आत्ता? तुझ्या जीभंला काही हाड? आन् काय झालं आसं तडातडा बोलत सुटलीस ती? एवढ्या लांबनं आलेली पोरगी आशी रातच्या टायमाला कुठं जानार? काही इचार करावा का न्हायी मानसानं?

प्राची : त्यांचा राग अगदी स्वाभाविक आहे. मला त्याचं काहीही वाईट वाटलेलं नाही.

सौ.येर. : बोलती बघा कशी लाजशरम कोळून पेल्यागत. आज ह्याचा हात धरला. उद्या दुसरा कोन आवडला की चालली त्याच्यामागं हेपलत–

श्री.येर. : तुझ्या तोंडाला आवर घाल जरा.

सौ.येर. : काय आवर घालू? सातारच्या आशक्याचं ठाव हाय ना? आखेरशेवटी राकेल वतून पेटवून घेतलं त्या पोरीनं.

प्रकाश : अगं आई पण त्यानं जबरदस्तीनं पळवून आणलं होतं त्या मुलीला. इथं आम्ही सर्व गोष्टी विचारपूर्वक करतोय. दोन्ही घरातील लोकांनी एकत्र यावं, परस्परांना समजून घ्यावं म्हणून प्रयत्न करतोय.

सौ.येर. : ही बामणाच्या पोटची, आपन मागासलेलं...

प्राची : त्यामुळं काय फरक पडतो? मी तर काहीही जातीभेद मानत नाही.

सौ.येर. : जातीभेद मानत न्हाय! तुमी आमी येक आन् कंठाळीला मेख.

प्राची : (प्रकाशला) म्हणजे?

प्रकाश : (हसत) तिच्या म्हणी आणि वाक्प्रचारांवर संशोधन करून पीएच. डी. मिळवशील तू.

श्री. येर. : (प्राचीला) तुझ्या घरच्यांनी परवानगी दिली का लग्नाला?

प्राची : अजून दिलेली नाही पण देतील ते.

श्री. येर. : म्हंजी ही एकप्रकारची सक्तीच झाली की.

प्राची : तसं नाही बाबा. आम्ही त्यांना विचार करण्याची पूर्ण संधी दिलीय. त्यांनी इथं यावं, तुम्हीही आमचं घर बघावं, परस्परांशी बोलावं आणि निर्णय घ्यावा अशी आमची भूमिका आहे.

श्री. येर. : बा काय करतो तुझा?

प्राची : बीएमसीमध्ये हेडक्लार्क आहेत. मनात आलं तर लग्न, मुंज, पूजापाठसुद्धा करतात. एक बहीण आहे मोठी. तिच्या मिस्टरांचा पापड-लोणच्याचा बिझनेस आहे. आई घरीच असते.

श्री. येर. : आन् भाऊ?

प्राची : भाऊ नाही मला. मी जन्माला आल्यावर बाबांनी ऑपरेशन करून घेतलं. आईनं आधी घर डोक्यावर घेतलं पण बाबांनी समजावून सांगितल्यानंतर तयार झाली.

श्री.येर. : हेच्याबरूबर लगीन करायचं कसं काय ठरवलं तू?

प्राची : तो मला आवडला. हुशार आहे, देखणा आहे, चांगली नोकरीदेखील मिळालेय. नोकर, चाकर, गाडी, बंगला, फोन...

श्री. येर. : आन् उद्या समज हे समदं गेलं...

प्राची : (हौसाबाईंकडे बघत) तरीही मी त्याला सोडणार नाही.

श्री. येर. : आन् त्ये का?

प्राची : कारण सर्वात महत्त्वाचं म्हणजे माझं त्याच्यावर प्रेम आहे.

श्री.येर. : ( खुश होत) हाय आत्ता ? हा हा हा हा सूनबाई पसंत हाय आपल्याला. हौशे, मीठ-म्हवऱ्या घेऊन ये आनी दिठ काढ पोरीची.

प्राची : दृष्ट नंतर काढा, आधी जेवायला वाढा. पोटात कावळे कोकलताहेत आणि मटणाच्या वासानं पाणी सुटलंय तोंडाला.

श्री.येर. : म्हजे मटणपन खातीस का काय तू?

प्राची : त्यात काय नवल वाटतंय तुम्हाला, अनेक ब्राह्मण मटण खातात हल्ली आणि त्यामुळंच तर मटणाच्या भावात वाढ झाली नाही?

सौ.येर. : ( आत निघत ठसक्यात) हाय खरी लाखात येक. (सर्वजण हसतात. हौसाबाई आत जातात.)

श्री. येर. : (हसता हसता ) खरंच लाखात येक हाय पोरगी. मला तर आगदी म्हवना- बटाव वगाची आठवन झाली.

प्राची : कोणता वग म्हणालात?

प्रकाश : अगं मोहना-बटाव नावाचा एक फार पॉप्युलर वग होऊन गेला आपल्याकडं. अगदी रोमियो ज्युलिएटच्या तोडीची कलाकृती आहे ती. पण तमाशातला वग म्हणून लोकांनी दुर्लक्ष केलं. करंटेपणा नसानसात भिनलाय आपल्या...

प्राची : अय्या, म्हणून दाखवाना ते. हा फार कौतुक करतो तुमच्या गायकीचं...

श्री.येर. : दोन घंटे लागत्याल समदं ऐकवायला. जेवण झाल्यावर बसू रातच्याला.

प्राची : थोड तरी ऐकवा ना आता सॅम्पल म्हणून... प्लीज?

श्री.येर. : ( बरं म्हणून बाटली काढून घोट घेतात. त्या वगाच्या कथानकात बुडून...) म्हवना नारीच्या रूपाची ख्याती समद्या दुनियेत पसरली. बटाव नावाचा यापाऱ्याचा एक मुलगा तिच्या रूपाची ख्याती ऐकून येडापिसा झाला. आपल्या बायकोला, आई बापाला, मित्रांना सोडून तो तिला भेटाऱ्यासाठी निघाला. कसा? तर अबलख घोड्यावर बसून. (चालीवर)

दिल्ली शहराचा बटाव झुरा बावरा

हजारात हिरा, लाखाचा मोहरा

(प्रकाश बदलत जातो, तमाशा शैलीचं पार्श्वसंगीत)

रूपानं गोरा, वयं पंचवीस कवळा चेहरा

दंडात दंडपट्या रेशमी दोरा

मस्तकी खवून मोत्याचा तुरा

अंगात कपडा जरीचा सारा

शब्द त्याचा सुटतो मंजूळ वारा

मुखी पानाचा रंगला विडा

नामी पायात रंगला विडा

नामी पायात पठाणी जोडा, शिंदेशाही तोडा

गोफ करदोडा पवित्रलेला

गळ्यामधी कंठी मोहनमाळ

मंदील ढाळ देतो रेशमी पिवळा

अंगात अंगरखा किनखापी

काळा ओतीव पुतळा

भरनवतीचा पानमळा

मराठी रहानी डौल येगळा

मातोसरी जाऊन पडती गळा

मुखात मुख घाली बटाव तू बाळा

नागिणीला नाग जन्मलास घवळा

यशोदेचा कृष्ण सावळा

तसा तू मला देवानं दिला

एकंदर गाव जमा झाला

पाणी आलं कैकांच्या नेत्राला

बळाव चालला ऽ ऽ ऽ हे... हे.... हे...हे....

जीरं राम दाजी ऽ ऽ ऽ हे हे हे हे हे हे हे हे है...

( एक वेगळे हळवे वातावरण निर्माण होते. श्री. येरमाळकरांची झील टिपेला जाते. प्रकाश हळूहळू प्रकाशवर एकवटतो आणि अंधार)

अंक पहिला/ प्रवेश तिसरा (अ)

(श्री. जोशी यांचे घर. सकाळ. त्यांची पूजा सरू आहे. एक श्लोक अंधारातच एकू येतो. नंतर हळूहळू प्रकाश.)

श्री. जोशी : ध्येयः सदा सवितृमण्डलमध्यवर्ती

नारायणाः सरसिजासनसंनिविष्टः

केयुरवान्मकरकुण्डलवान् किरीटी

हारी हिरण्मयवपुर्धृतशंखचक्र:

ॐभानवे नमः, ॐमरिचये नमः,

ॐ मित्राय नमः, ॐ रवये नमः, ॐ सूर्याय नमः, ॐ खगाय नमः ॐ पूष्णे नमः, ॐ हिरण्यगर्भाय नमः, ॐ अर्काय नमः, ॐ आदित्याय नमः, ॐ सवित्रे नमः, ॐ भास्कराय नमः (पळीने हातावर पाणी घेत.) अकालमृत्युहरणम् सर्वव्याधीविनाशनम् सूर्यपादोदकं तीर्थम् जठरे धारयाम्यहम् (तीर्थ प्राशन करून ताम्हनात हात धुवून नमस्कार करीत) अनेन नमस्काराख्येन कर्मणा भगवान श्री सूर्यनारायणः प्रियताम... (सवयीने शर्ट घात) अगं ए ऽऽ ऐकलंस का? (पेपर घेऊन खुर्चीत वाचत बसतात. चहा येत नाहीसा पाहून थोड्या वेळानं) अगंSSS

सौ.जोशी : (नवीन साडचा पदर नीनेटका करत बाहेर येत) काय?

श्री.जोशी : चहा नाही आज? आणि हे काय, कसली तयारी? बाहेर-बिहेर चाललीस की काय कुठं?

सौ. जोशी : जान्हवीकडे जातेय मी.

श्री. जोशी : अगं आता तर पाहुणे येण्याची वेळ झाली.

सौ. जोशी : म्हणूनच चाललेय.

श्री. जोशी : (चिडत) काय म्हणायचय काय तुला?

सौ. जोशी : हातात आरती घेऊन उभी राहू का दरात? शेजारी-पाजारी कळलंय सर्वांना लोक फिदीफिदी हसताहेत.

श्री. जोशी : अगं पण तू विरोध केलास म्हणून लग्न व्हाचं राहणार आहे का त्यांचं?

सौ. जोशी : माझ्या नजरेआड काय कराचं ते करा.

श्री. जोशी : म्हणजे नजरेसमोर करायला नको इतकंच ना? एका अर्थानं परवानगीच झाली तुझी ही.

सौ. जोशी : काय अर्थ काढायचा तो काढा तुम्ही. मी चालले.

श्री. जोशी : ( आणखी चिडत) एखाद्या प्रश्नाला असं पाठ फिरवून जाणं सोपं वाटत असलं तरी तो प्रश्न आपली पाठ सोडत नाही हे लक्षात ठेव.

सौ. जोशी : मग मी का करू म्हणता?

श्री. जोशी : ते लोक येतील आता. ऊठसूट अपमान करणार आहेस का त्यांचा?

सौ. जोशी : तुम्ही करा तुम्हाला काय आगत स्वागत करायचंय त्यांचं ते.

श्री. जोशी : म्हणजे माझी एकट्याचीच जबाबदारी? प्राची तुझी कुणीच नाही का? (सौ. जोशींचे बेदरकार मौन. त्यांना समजावत) आता मला तरी काय स्वप्न पडलं होतं का की अकस्मातपणे ह्या अशा अवघड वळणावर येऊन उभे राहू आपण? तू डोक्यात राख घलून घेऊ नकोस. दुसरा कोणताही शहाणपणाचा मार्ग आपल्यासमोर नाही. आयुष्यभर सर्व सुखदुःखाच्या प्रसंगी माझ्यासोबत माझ्या सावलीसारखी राहिलीस तू आणि आता....

सौ. जोशी : ह्या खोलीत सर्व व्यवस्था करून ठेवलेय मी त्यांची.

श्री. जोशी : मला माहिताय ते. पण तू इथं असल्याशिवाय काही अर्थ आहे का त्या व्यवस्थेला? माझं ऐक. आलेल्या प्रसंगाला धीरानं तोंड द्यायला तयार हो.

सौ. जोशी : देवा सत्यनारायणा, सत्वपरीक्षाच घेतोहेस रे बाबा माझी...

श्री. जोशी : तसं समज.

( दारावर टकटक होते आणि पाठोपाठ 'हाये का कोनी घरात?' असा येरमाळकरांचा खडा सवाल ऐकू येतो. 'हो हो, आलो आलो' म्हणत जोशी दाराकडे निघतात. श्री. जोशी दार उघडतात. दारात श्री. व सौ. येरमाळकर उभे. येरमाळकरांच्या हातात ट्रंक. मोठी ढगाळ पँट. इन् केलेला शर्ट. वरती चौकडीचा कोट. सौ. येरमाळकर खणाची चोळी, घाटी पद्धतीचं लुगडं. आडवं कुंकू, नाकात नथ.)

श्री. येर. : (ओळख करून देत.) मी येरमाळकर.

श्री. जोशी : हो हो आलं लक्षात. या... या... प्राची गेली होती स्टेशनवर तुम्हाला घेण्यासाठी.

श्री. येर.: हो आलीती की ! खाली कुठंतरी फोन कराया गेलीय पैलवानाबरूबर.

श्री. जोशी : कसा काय झाला प्रवास?

श्री. येर. : प्रवास झ्याक झाला पन हमालानं लय झगझग केली मायला. (सौ. जोशींकडे लक्ष जातं) नमस्कार वैनीसाहेब! (त्या नुसत्याच पदर सावरून घेतात. त्यांनाच) पानी घ्या वाईच. (सौ. जोशींचा निर्णय होत नाही श्री. जोशी उठून तांब्या पेला आणतात आणि येरमाळकर घटाघटा पाणी पितात आणि आपल्या सौ. ला) आन् तू कशापाय उभी ऱ्हायलीस हितं ध्यानागत?

सौ. येर. : त्वांड धवायचं व्हतं, मोरी कुठाय?

श्री. येर. : हाय आत्ता? आगं मलाच इचारतीस व्हय मोरी कुठाय ती?

श्री. जोशी : हे बघा, तुम्ही असं करा... ह्या खोलीत चला. तिथं व्यवस्था केलेय सर्व. ( येरमाळकर ट्रंक उचलून आत जातात...(सौ. जोशींना) जरा चहा घेऊन ये बरं तू. (त्या फणकाऱ्यातच आत जातात.)

श्री. येर. : (दीर्घ श्वास घेत) वा वा वा आगदी देवळात आल्यागत वाटलं बघा. काय पूजाबिजा केली का काय?

श्री. जोशी : हो, पूजा केल्याशिवाय आमचा दिवस सुरू होत नाही.

श्री. येर. : (उठून देव्हाऱ्याकड जात) देवावर इश्वास हाय का तुमचा?

श्री. जोशी  : आता विश्वासाचं म्हणाल तर कुठंतरी श्रद्धा ठेवणं हे आवश्यकच असतं नाही का?

श्री. येर. : ते बी खरंच म्हना. (देवासमोर लोटांगण घालत) देवा, जरा आमच्याकडं पन ध्यान आसू द्या म्हनलं, काय? (फूल किंवा हळद कुंकू वहात) घ्या. अंग आस्सं. ( उठून श्री. जोशींना आचमनाची कृती करून दाखवत) ते आसं हातावर पानी घेऊन असं पेतात त्येला काय म्हनतात की?

श्री. जोशी : आचमन!

श्री. येर. : हां आच्मन. आच्मन... आन् तवाच ते केशवायनमा, म्हादवाय नमा म्हनायचं आस्तं नव्हं?

श्री. जोशी : अगदी बरोबर, तुम्हाला कसं माहीत?

श्री. येर. :: आता आपली हाय थोडी थोडी म्हायती झालं. आन् ते 'संध्या' का काय ते?

श्री. जोशी : हां संध्या, संध्या.

श्री. येर. : त्ये कशासाठी करायचं आस्तं?

श्री. जोशी : संध्या अशासाठी करायची असते की आचमनाने अतिंद्रिये, प्राणायामाने हृदय- फुफ्फुस, मार्जनाने आरोग्य आणि मंत्रोच्चाराने चित्त आणि वाणीची शुद्धी होते.

श्री. येर. : (चक्रावून) परत साळेत बसल्यागत वाटलं बघा, हा: हा: हा: हा:

श्री. जोशी : तुम्ही करता का कधी पूजा?

श्री. येर. :  तेवढं कुठलं आपलं भाग्य? समदं आविष्य गेलं चोर - दराडेखोरांच्या संगतीत. भडव्या आन् भोसडीच्या हीच आपली वाणीसुद्धी, काय? हा: हा: हा: हा:

श्री : पण तुमचा विश्वास आहे का देवावर?

श्री : आजाबात न्हायी.

श्री : मग आता तुम्ही पाया पडलात ते?

श्री : ते तुमाला बरं वाटावं म्हनून. खरं सांगा तुमाला बरं वाटलं का न्हाय?

श्री. जोशी : खरंच, अगदी मनापासून आनंद झाला मला.

श्री. येर. :  हां तसाच आता आपन ह्या पोरांच्या आनंदाचा इचार करायचा.

श्री. जोशी : म्हणजे प्रकाश-प्राचीविषयी बोलताय तुम्ही?

श्री. येर. : नाहीतर कोनाइषयी? ही नवी पिढी लय समजदार हाय बघा... त्या दोघानी पळून जाऊन लग्न केलं असतं तर केवढा घोळ झाला आसता सांगा? मग गावभर बभ्रा. इज्जतीचा पंचनामा. तुम्ही आम्हाला दोस देनार, आमी तुमाला. पेपरात बातम्या छापून येनार. लोक तोंडाला येईल ते बोलनार. अशावेळी कंट्रोल सुटला तर मानूस कायबी बरं-वाईट करून घेतुया जीवाचं... आन मग संपलंच की समदं. सापा- मुंगसाचं नातं जन्माला येतंय बघा. पिढ्यान् पिढ्या उभा दावा... पन ह्या पोरानी वाचीवलं आपल्याला. लग्नाला परवानगी द्या न्हायतं नका दिवू पन दुष्मनी हाली का सांगा बर?

श्री.जोशी : अगदी खरं आहे तुम्ही म्हणताय ते. पण...

श्री.येर. : वैनीसायबांचा इरोध हाय.

श्री.जोशी : तुम्हाला कसं माहीत?

श्री.येर. : आता ही काय लपून -नारी गोष्ट हाय का? काय म्हननं काय हाय त्यांचं?

श्री.जोशी : खालच्या जातीतली मुलगी केली तर चालते इतपत मान्य करतेय ती. शास्त्रात आधार आहे अशा अनुलोम विवाह पद्धतीला.

श्री.येर. : हाय आत्ता? आमच्यातबी डझनावारी पोटजाती हायेत बघा. त्यातसुद्धा खालच्या आन् वरच्या असा फरक. म्हंजी समजा आमच्या पोरानं आमच्याबीपेक्षा खालच्या जातीतली पोरगी केली आस्ती तर आमच्या समद्या पाव्हण्या- राव्हण्यांनी बोंबाबोंब केली आस्ती... (ढोर समाजाच्या माणसानं कमावलेलं कातडं जेव्हा चर्मकार चपला शिवण्यासाठी ताब्यात घेतो तवा आधी त्यावर पाणी शिपडून ते पवित्रा करून घेतो...) टकुरं फिरून जातं मायला. आन बायांना तर दलितांपेक्षाही (सगळ्यांच्याच)खालचं मानायचं हा अन्याव न्हाय का?

श्री.जोशी : तुम्हाला आश्यर्य वाटेल पण आमच्यातसुद्धा देशस्थ कोकणस्थासारखे इतके भेद आहेत लग्न जुळवायचं म्हणजे एखाद्याची चामडी सोलून काढल्यासारखंच करतात लोक. पेशव्यांकडे सुद्धा देशस्थांच्या आणि कोकणस्थांच्या पंगती वेगवेगळ्या उठायच्या...

(आतून सौ. जोशींची “ अहो ऐकलंत का, इकडं या जरा" अशी हाक ऐकू येते. श्री. जोशी “आलो आलो” म्हणत आत जातात आणि हातात चहाचे कप घेऊन बाहेर येतात. 'घ्या' म्हणून कप येरमाळकरांना देतात.)

श्री.येर. : (एक घोट घेऊन) तुमचं सोताचं काय म्हननं हाय?

श्री.जोशी : आता स्पष्टपणेच सांगायचं तर माझ्या जागी अगदी जरी तुम्ही असता तरी अगदी तुम्हीही ह्या लग्नाला परवानगी दिली नसती. पण विरोध करण्यात शहाणपणा नाही हे लक्षात आलंय माझ्या. वर्तमानेन कालेन बुधो लोको प्रवर्तते...

श्री.येर. : आँ?

श्री.जोशी : परिस्थिती पाहून वागण्यातच शहाणपणा असतो.

श्री.येर. : हां... म्या नेमकं हेच सांगिटलं व्हतं हौशीला. तिची आशी विच्छा व्हती की ह्यानं तिच्या भावाच्या मुलीशी संबंध करावा. गरीब घरातल्या आन् आपल्याच जातीतल्या पोरीचा उद्धार व्हईल आसं म्हननं व्हतं तिचं.

श्री.जोशी : हं. तेही काही चूक नव्हतं म्हणा.

श्री. येर : तशी ती पोरगीबी चांगली व्हती. पन तिचा बा म्हजी एक नंबरचा डँबीस मानूस. युनियनच्या नावाखाली काही ना काही उचापती चालूच आस्तात भडव्याच्या!

(प्रकाश आणि प्राची येतात. प्रकाशच्या हातात प्रवासी बॅग. प्राचीकडे किरकोळ सामान. )

प्राची : ( सर्वांना बातमी देत) रवींद्रला फोन केला होता. चांगलं नाटक लागलंय. संध्याकाळी जाऊ सर्वांनी.

श्री.येर. : आर आर आर आर आगं पोरी, येवढ्या लांबनं आलो तर जरा टेकून तर देशील का न्हाय घटकाभर?

प्राची : त्याचं काय आहे ह्या नाटकाचे प्रयोग नंतर लागणार नाहीत एवढ्यात. म्हणून घाई केली. आईचं सुद्धा चाललं होतं बऱ्याच दिवसापासून नाटक कसं असतं ते बघायचंय म्हणून...

श्री.येर. : मग आसं करा पैलवान, तुमी जावा समद्यानी. आमी दोघं बसू इथंच गप्पा ठोकत (श्री. जोशींना) काय?

श्री.जोशी : हो चालेल की. माझी काही हरकत नाही.

(एकदम सौ. जोशी घबऱ्या घुबऱ्या होऊन आतून खोकत खोकत बाहेर येतात. त्यांच्या सोबत इतरही सर्वजण खोकू लागतात.)

श्री. जोशी : (खोकत) काय झालं ग?

सौ. जोशी : (खोकतच) आहो तंबाखूचा वास कुठून येतोय?

श्री. जोशी : तंबाखूचा वास? (खोकत ) आपल्या घरात कुठला आलाय तंबाखू? (खोकतात)

श्री. येर. : हा: हा: हा: हा: आलं ध्येनात. (त्या खोलीकडे जात) आगं एऽऽ हौशेऽऽ अगं काय करतीस आत? तंबाखू भाजतीस व्हय? एक दिस दम निघना झालं का काय? हा: हा: हा: हाः (श्री व सौ. जोशींना) हे बघा आमच्या मंडळीला सकाळ संध्याकाळ मशेरी लावल्याशिवाय चैनच पडत न्हाय. एकडाव सांजच्याला न्हाय मिळाली तर चालंल पन सकाळच्याला पायजेच. नायतं झाला घोटाळा!

श्री. जोशी : घोटाळा?

श्री. येर. : आहो मशेरी लावल्याशिवाय तिला (हाताने 'तांब्या' घेतल्याची कृती करून दाखवत) व्हतंच न्हाय की. हा हा हा हा (हळूहळू अंधार)

अंक पहिला/ प्रवेश तिसरा (ब)

(स्थळ तेच. संध्याकाळ. श्री. जोशी पेपर वाचत बसले आहेत. काही वेळानं श्री. येरमाळकर त्यांना दिलेल्या खोलीतून आळस देत बाहेर येतात.)

श्री. जोशी : याऽऽ काय, झाला आराम?

श्री. येर. : आरामाची तशी गरज नव्हती म्हना, पन जेवनाचा बेत आगदी जंक्शन झाला का न्हाय? त्येनंच सुस्ती आली मायला. जन्मात आशी पुरणपोळी खाल्ली नव्हती बघा. आनपूर्णा हाय तुमची बायको.

श्री. जोशी : स्वयंपाक प्राचीनं केला होता.

श्री. येर. : म्हंजे वैनीसायबानी बहिष्कारच घातलाय म्हना की आमच्यावर.

श्री. जोशी : तसं काही म्हणता येणार नाही, पण तिची समज पटायला जरा वेळच लागतो.... दोन मुली झाल्यावर मुलाचा हट्ट धरला होता. समजावून सांगितल्यावर पटलं... आता स्वत:च सर्वांना सांगते की मुलगा आणि मुलीत काहीही फरक नसतो म्हणून.

श्री. येर. : नाटकालासुद्धा जात नव्हत्या म्हने...

श्री. जोशी : आधी नाही म्हणाली पण ऐकलं शेवटी.

श्री. येर. : चला झ्याक झालं. बोलून चालून मोकळं असावं मान्सानं. मनात कायबी ठेवू नयी. तुमी या येरमाळ्याला मग बघा कशी ऊठबस करतू तुमची ती धा एकर बागायत हाय आपली. भाजीपाला, दूधदुभतं रगड हाय. हिरीला वरीसभर मुबलक पानी आस्तया. सकाळ-संध्याकाळ चार बादल्या आंगावर घेतल्या की कसं जक्शन वाटतंय बघा.

श्री. जोशी : मोकळ्या वेळात काय करता?

श्री. येर. : आलं मनात की तमाशाला जाऊन बसतो. नायतं मग (खिशातून बाटली काढत) हायच ही आपली बया.

श्री. जोशी : काय आहे ते?

श्री. येर. : काय नाय– आपलं, औषध हाय औषध. हा: हा: हा: हा: (एक घोट घेऊन) काय घेनार का?

श्री. जोशी : छे छे भलतंच काय.

श्री. येर. : घ्या की थोडी.

श्री. जोशी : नको नको भीती वाटते आपल्याला.

श्री. येर. : एक घोट घेऊन बघा. भीती न्हायशी व्हईल एक मिन्टात. वाघागत डरकाळ्या फोडाय लागाल मग.

श्री. जोशी : नको नको.

श्री. येर. : कधी घेतली न्हवती का?

श्री. जोशी : नाही म्हणजे तसं... म्हणजे...

श्री. येर. : आँ? हां. हां... आलं ध्येनात, हा हा हा हा: (त्यांच्या हातात बाटली कोंबत) गावाकडची पयल्या धारंची हाय. घ्या.

श्री.जोशी : अहो पण...

श्री.येर. : काय नव्या नवरीगत जालताय ... घ्या की पट्कनी. मारा... हं... ( श्री. जोशी एका हातात बाटली धरून दुसऱ्या हाताच्या तळव्यावर एक घोट ओतत आणि आचमन केल्याप्रमाणे पितात. प्रकाश बदलतो. दुसरा घोट, तिसरा घोट असे सुरू होते. श्री. येरमाळकर टायमिंग साधून गंमत म्हणून ओम् केशवायनमा, म्हादवायनमा, गोविंदायनमा करत हा हा हा हा: करून हसतात. “हाना तिच्यायला, मारा थोडी आजून, शाब्बास, आंगं आश्शी असं म्हणून उत्तेजन देत राहतात. याला संगीताची जेङ बरीचशी पिऊन जोशी बाटली खाली ठेवतात. आता त्यांना चांगलीच चढलेली.)

श्री. जोशी : पावनं?

श्री. येर. : (चमकून) काय म्हनाला?

श्री. जोशी : पावनं....

श्री : व्वा! लयी ग्वाड लागलं बघा कानाला. काय म्हन्ता? बोला.

श्री. जोशी : आजपासून आपण भाऊ भाऊ.

(येरमळकर सातमजली हसतात.)

श्री. जोशी : एवढं हसायला काय झालं?

श्री. येर. : आपलं सरकार किती गाढव हाय.

श्री.जोशी : ते कसं काय?

श्री. येर. : त्याला साधं जाती निर्मूलन करता येत न्हाय-

श्री. जोशी : म्हणजे कसं म्हणता?

श्री. येर. : अवो एका मिन्टात एक बामण आन् एक मागासवर्गीय ह्याना समान पातळीवर आननाऱ्या ह्या अमृताचा उपेग सरकार जाती निर्मूलनासाठी का करून घेत न्हायी म्हन्तो म्या?

श्री. जोशी : म्हणजे जातीयता नष्ट करायची असेल तर दरू खुली केली पाहिजे असं म्हणायचंय का तुम्हाला?

श्री.येर. : आक्षी बराबर.

श्री. जोशी : गाढव सरकार नाही, तुम्ही आहात.

श्री. येर. : म्या? आन् तो कसा काय?

श्री. जोशी : अहो दारू उतरली की जात पुन्हा चढायला लागते की नाही माणसाना?

श्री. येर. : हां. तेबी खरंच हाय म्हना, पन मग आसं केलं तर?

श्री. जोशी : कसं?

श्री. येर. : दारू उतरूच देयाची न्हाय. चव्वीस घंटे नशेतच ऱ्हायाचं...

श्री. जोशी : छे छे! ते कसं काय शक्य आहे?

श्री. येर. : का बरं? गेली कित्येक वर्ष जातीधर्माच्या नशेत हत नाय आपन? कधी सुद्धीवर आसल्यागत येवहार केला का आपन एकेकांशी? ह्या जातीधर्माच्या नशेने जनावर करून टाकलं का न्हाय मानसाचं?

श्री. जोशी : हो, पण हे हळूहळू लक्षात येतंय लाकांच्या आणि म्हणूनच आज जातीव्यवस्था कोलमडून पडलेली दिसते.

श्री. येर. : आसं कशावरनं म्हन्ता तुमी?

श्री. जोशी : नाहीतर मग आपण दोघेजण इथं दारू पीत कशाला बसलो असतो?

श्री. येर. ते बी खरंच हाय म्हना, पन मानसाच्या मनातली जात गेली का? सत्य बोला आगदी...

श्री. जोशी : तशी सूक्ष्म पातळीवर सर्वांच्याच मनात जात आपलं अस्तित्व टिकून आहे हे खरं आहे.

श्री. येर. : हितंच तर खरी मेख हायं. येकडाव तोंडावर भडाभडा बोललेलं परवडलं पन हे सूक्ष्म पातळीवर मनात ठेवनं लयी डेंजरस बघा. जातीपाती तयार करताना लयी नामी डोस्क वापरलं भोसडीच्यानी!

श्री. जोशी : (संतापत) म्हणजे ब्राम्ह्मणानीच ना?

श्री. येर. : म्या कुठं म्हनलं तसं?

श्री. जोशी : नाहीतर काय अर्थ आहे तुमच्या बोलण्याला ? (दारूमुळे उत्तेजित होऊन भांडत) लक्षात ठेवा मनुस्मृती सांगणारा मनू हा ब्राह्मण नव्हता. गीता सांगणारा श्रीकृष्ण आणि ती ऐकणारा अर्जुन हेसुद्धा ब्राह्मण नव्हते.

श्री. येर : म्या काय म्हन्तो...

श्री. जोशी : काही म्हणायची गरज नाही. एका बाजूने सवलती उपटायच्या आणि दुसरीकडून इतिहासातल्या लढाया वर्तमानकाळात आणायच्या...

श्री. येर. :  हाय आत्ता?

श्री. जोशी : जातीव्यवस्था ब्राह्मणांनी निर्माण केली असेल पण ती राबवली कुणी? कुणी राबवली सांगा? प्रश्नाच्या मुळात हात घालायचा नाही. उगाच आपलं साप साप म्हणून भुई धोपटत बसायचं....

श्री.येर. : आवो म्या तेच सांगतोय तुमास्नी. ह्या प्रश्नाचा इचार आपन समद्यानी मिळूनच करायला हावा का नको?

श्री.जोशी : (तावातावाने) आज जात कुणाला हवी सांगा? कोण आहे जातीच्या मुळाशी?

श्री.येर. : आता तसं बघितलं तर जातीच्या मुळाशी राजकारणच हाय नव्हं?

श्री.जोशी : हं आता बरेबर बोललात. आपली सत्ता अबाधित राहावी म्हणून राजकारण्यांना जात जिवंत ठेवायची आहे, मग ते कोणत्याही पक्षाचे असोत. आपल्या या महान लोकशाहीवादी देशातल्या सगळ्या निवडणुका शेवटी जातीवर जातात, काय? (हात पुढे करून टाळी घेतात.)

श्री.येर. : म्या बी तेच सांगतोय तुमाला ह्या राजकारन्यानीच समदा इस्कोट करून टाकलाय देशाचा. ज्याला आपन सामान्य मानूस म्हणतो त्याला त्याच्या भाकरीचीच इवंचेना इतकी आस्ती की जाती धर्माचा इचार करायला  येळतरी मिळतो का त्याला? हे पुढारी आपल्या चमच्यांना आनि पत्रकारांना हाताशी धरून समदं भूत उभं करत्यात बघा. गावात कुठं काही खाजगीतली भानगड जरी झाली तरी लगेच 'दोन गटात दंगल' आशी बातमी छापून मोकळे व्हतात भडवीचे!

श्री.जोशी : पण नवीन परिस्थितीशी ब्राह्मणांइतकं कुणीही जुळवून घेतललं नाही हे लक्षात घ्या. ब्राह्मण जितके बदलल तितके मराठे बदलले का? सांगा... आजही हे लोक सत्तेच्या आणि संपत्तीच्या मेंदूने वागतात. त्यांची बोद्धिक आणि सांस्कृतिक पातळी सुधारण्याची कामगिरी हाती घ्या की ऊठसूट ब्राह्मणांना ठोकण्याऐवजी!

श्री.येर. : म्हजी कसं म्हणता?

श्री.जोशी : तुम्ही सकाळी म्हणालात ना त्याप्रमाणं खरंच नवीन पिढी अतिशय समजदार आणि हुशार आहे. मराठी समाजातही प्रगत विचाराच्या तरूणांची फळीच्या फळी तयार होत आहे. ह्या तरूण पिढीलाच जुन्या

पिढीविरूद्ध उभं करावं लगेल. पांडव जसे स्वकीयांविरूद्ध लढायला तयार झाले त्याचप्रमाणं ही प्रगत विचारांची नवी पिढी जुन्या मताच्या पिढीच्या विरोधात उभी राहिली तर एक नवीनच महाभारत घडेल आपल्या देशात. आणा ती बाटली इकडं (येरमाळकरांकडून बाटली हिसकावून घेतात आणि तशीच तोंडाला लावून घटाघटा पितात, आपटून खाली ठेवताता आणि मनगटाने तोंड पुसत विजयी उमेदवारांप्रमाणे येरमाळकरांकडे पाहातात. त्यांच्या ह्या कृतीला येरमाळकर उत्स्फूर्तपणे हा: हा: हा: हा: करून दाद देतात.)

श्री. येर. : तुमी मटण खाता का न्हायी कधी?

श्री. जोशी : तसं खात नाही पण...

श्री. येर. : रस्सा चालतो म्हना की!

श्री. जोशी : तुम्हाला कसं माहीत?

श्री. येर. : एक आपला आंदाज.

श्री.जोशी : तसं बाहेर थोडंफार खाण्यापर्यंत मजल गेलेय, पण घरात चालत नाही.

श्री.येर. : तुमी येरमळ्याला या, रोज बोकड आनि कोंबड्या कापून खायला घालतो.

श्री. जोशी : स्पष्टपणे विचारतो म्हणून माफ करा - ( थांबून अंदाज घेतात)

श्री. येर. : : इचारा की!

श्री. जोशी : तुम्हाला तमाशाचा फार नाद आहे म्हणजे.

श्री.येर. : म्याच सांगिटलं नव्हं तुमास्नी? म्या बघीतला न्हाय आसा तमाशा उभ्या म्हाराष्ट्रात शोधू सापडायचा न्हाय! दादू इंदूरकरापासून प्रकाश खेडेकरापातून येकेयेक खेळ चारचार डाव बघून झालाय माझा....

श्री.जोशी : तिथं फार अचकट-विचकट आणि अश्लील प्रकार चालतात म्हणे.

श्री.येर. : हेच चुकतं तुमचं शिकलेल्या लोकांचं. आपल्या चौकटीभायेर जगच न्हाय आसं वाटतं तुमाला. आवो तमाशासारखं मनोरंजनाचं आन् शिक्षनाचं  साधन न्हाय दुसरं... आन् प्रतेक वगामधी असत्यावर सत्याचा इजय झालेला दाखवतात. स्वप्नात दिलेला शब्द पाळणाऱ्या हरिश्चंद्राचा वग जोपतूर गावोगावी व्हईल तोपतूर समाजातली नितीमत्ता शाबूत हायील हे ठावं हाय का तुमाला?

श्री. जोशी : वा! याची कल्पना नव्हती मला.

श्री. येर. : आता न्हायी म्हनायला गवळण, लावणी, बतावणीत आस्तुया थोडा चावटपना, पन त्यो जर नसला तर तमाशाचं कीर्तन व्हनार नाय का?

श्री. जोशी : बरोबर.

श्री. येर. : (उत्स्फूर्तपणे चालीवर म्हणतात-)

तुम्ही गौरीच्या नंदना, विघ्नकंदना

या नाचत रंगणी जीऽऽ जीऽऽ

श्री.जोशी : वा! आवाज खरंच छान आहे तुमचा.

श्री.येर. : राधा म्हणे श्री. हरी तुम्ही रात्री होता कोणे ठायी? (श्री. जोशी खुद्कन हसतात) आता ह्यात गंमत हाय पन वंगाळपना हाय का?

श्री.जोशी : छे छे, तसं तर मुळीच वाटत नाही.

श्री.येर. : आता हेच बघा, एक नायकीण म्हंजी नाचगणं करणारी बाई घरासमोर उभी आस्ती. तिकडनं सोंगाड्या येतो. त्या दोघांचं बोलनं कसं व्हतं बघा (कृती करून दाखवत)

सोंगाड्या : काय गं तू इथं का उभी - हायली?

नायकीण : घाम आला म्हनून हवा खायला भायेर येऊन उभी ऱ्हायले.

सोंगाड्या : आसं व्हय?

नायकीण : हो, काय करायचं बाबा, आत असलं म्हंजी गरम वाटतं आन् भायेर आलं म्हंजी गार वाटतं. (जोशीना हास्याची उकळी फुटते.)

सोंगाड्या : आमच्याकडं ह्याच्या उलट हाये!

नायकीण : ह्याच्या उलट हाये?

श्री.येर. : म्हजी आसं की बाहेर आहे तोपर्यंत गरम असतं. आत गेल्यावर गार वाटतं. (जोशींची हसून हसून मुरकुंडी वळते.) आता ह्याला तुमी हसताय पन ह्यातला आध्यात्मिक अर्थ ध्यानात आला का तुमच्या?

श्री.जोशी : आध्यात्मिक अर्थ?

श्री.येर. : शिव आनि शक्तीचा झगडा हाय ह्यात. कुनाला संसाराच्या आत ऱ्हाऊन परमार्थ करायला आवडतं तर कुनाला संसाराच्या भायेर ऱ्हाऊन... आलं ध्यानात?

श्री.जोशी : (हात जोडत) पावनं मानलं तुमाला आपून!

श्री. येर. : : काय मानलं? म्हवना - बटाव वग बघाल तर 'पिंजरा' मधल्या मास्तरागत कराय लागाल.

श्री. जोशी : मोहना - बटाव?

श्री. येर. : आमचा पैलवान म्हनतो रोम्यो-ज्युलेटच्या तोडीचं काम हाय ते.

श्री. जोशी : असं? एवढं काय आहे त्यात?

श्री. येर. : तुमाला थोडासा नमुना सांगतो. बघा, बटाव हा यापाऱ्याचा मुलगा. मोहनाच्या रूपाची ख्याती ऐकून आई- बाला टाकून त्यो तिला भेटायला जातो. मोहनाचं ल्हानपनीच लग्न झालेलं आस्तया. तिचा त्यो पहिला नवराबी योगायोगानं तिथं येतो. मोहना आणि बटाव यांचं पहिल्या दृष्टीभेटीतच येकामेकांवर मन जडतं. ते बघून मोहनाचा नवरा कपटानं बटावाचा खून करतो. त्याच्या आंगावर पडून मोहना आकांत कराया लागती.

(चालीवर)

इनंती करून दमली नार

हलेना अगदी झाला थंडगार

उलगडून पहिला तिने पदर

लाल रक्ताचा वाहिला पूर

पाहून दणदणा बडवती ऊर

आई-बाप बंधू तुझे राहिले दूर

शेजेची राणी असेल घरी

तिला पडला अंतर

कसा कोपला परमेश्वर

आमच्या पतीनं कापलं शीर

विनाकारण मारला याला

आमंत्रण देऊन ब्राह्मण आणला

पुढचा डाव हिरावून नेला

अशी गत झाली माझ्या सजणाला

हात तिनं पोटावरून फिरवला

(प्रकाश, प्राची, सौ.येर., सौ. जोशी येतात. मागेच उभे राहतात. ह्या दोघांना त्यांचा पत्ता नसतो.)

रूप्याचं पाणी चारलेला

खंजीर होता कमरेला

मोहना नारीनं खंजीर पाहिला

तिला मायेचा हुंदका आला

तिनं मोठ्यानं आकांत केला

पाच लाखाचा धनी आज गेला

आता काय प्राण ठेवू आपुला

डाव्या हातानं मिठी मारली गळ्याला

उजव्या हातानं खंजीर तिनं उरी मारून घेतला

प्राण मग गेला त्याच येळेला

जशी नदी मिळाली सागराला बटावाबरोबर मोहना गेली कैलासाला लिखा ब्रह्माचा नाही चुकला जीरं राम दाजीSSS

हे ऽऽ हे ऽऽ हे ऽऽ हे हे हे हे हे SSS

(येरमाळकरांची झील टिपेला जाते. त्यात श्री. जोशीही उत्स्फूर्तपणे भाग घेतात. प्रकाश आणि प्राचीवर प्रकाशझोत. अन्यत्र अंधार. एक हळवे आणि रहस्यमय वातावरण तयार होते. हळूहळू पडदा.)

**मध्यंतर**

***

(या नाटकाची पूर्ण संहिता ज्यांना हवी असेल त्यांनी संकेतस्थळी दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा.

या नाटकाचे प्रयोग, भाषांतर-रूपांतर, त्यावर आधारित दूरदर्शन मालिका, चित्रपट, टेलिफिल्म यासारख्या अन्य माध्यमातील रुपांतरासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. या नाटकातील कोणताही भाग, मुद्रित वा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमात कोणत्याही पद्धतीने वापरावयाचा झाल्यास त्यासाठीही लेखकाची पूर्व-परवानगी घ्यावी.)

***